# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/००१३२८**

**अपिलार्थी श्री. विनय वामन हुले**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (जी/उ विभाग)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जी/उ विभाग)**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत,
अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०५.२०२६</u>**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.११.२०२४ | ०१.०१.२०२५ | ०७.०३.२०२५ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.०६.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०१.०१.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थींनी दि. १४.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार वास्तुविशारद रेडकर ॲन्ड रेडकर यांनी ओम सिध्दिविनायक सह, गृहनिर्माण संस्था (नियो) अंतिम भूभाग क्र. ८८१, कलकत्ता वाला चाळ, एस. के. बोले मार्ग, जी/उ. टिपीएस क्र.४, माहिम विभाग, दादर (प) मु. ४०००२८. व द्वारकामाई एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या). या भुभाग क्रमांक ५३८, अंतिम भुभाग क्रमांक १६३ माहिम विभाग टि.पि.एस 3. भगत लेन मुंबई माहिम ४०००१६. या दोन वेगवेगळ्या झोपुप्रा योजना निरनिराळ्या नियमाखाली आपल्या कार्यालयातून मंजूर केले असून सदरहू योजना एकत्र आणून एकत्रीकरण clubbing करुन सदरहू योजना क्र. १ व योजना क्र. २ या दोनही योजनेस दि. ०२.०४.२०२४, रोजी clubbing L.O.I, निर्गमित करण्यापुर्वी तसेच मान्यता देण्यापुर्वी द्वारकामाई एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था (मर्या). या भुभाग क्रमांक ५३८, अंतिम भुभाग क्रमांक १६३ माहिम विभाग टि.पि.एस ३, भगत लेन मुंबई माहिम ४०००१६. या इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्यावर सदर पुनर्वसन इमारतीतील ७ व १४ व्या मजल्यावरील Refuge Floor मध्ये तसेच पि.ए.पि सदनिका क्र. १४०१, १४०२, १५०१ व १५०२, या १४ व १५ व्या मजल्यावरील तसेच सदनिका क्र. १७०१, १७०२, १८०१ व १८०२, या १७ व १८ व्या या मजल्यावरील PAP सदनिका मध्ये केलेल्या अनधिकृत नियमबाहय, बेकायदेशीर रित्या बांधकाम (Regularization)

..२/-

करण्यासाठी (MCGM Circular No-CHE/DP/१६१/Gen २०२१-२२ dt. १५.०५.२०२१) सदर MCGM Circular अनुषंगाने उक्त नमुद दोनही योजनेस दि. ०२.०४.२०२४ रोजी clubbing L.O.I, निर्गमित करण्यात आले या नमुद केलेल्या MCGM Circular सर्व व संपुर्ण प्रती सत्य छायांकीत करुन मिळाव्यात याबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दि. ०१.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, आपल्या अर्जात विचारणा केलेली माहितीबाबत या विभागाच्या अभिलेखावरील प्रथम दर्शनी उपलब्ध माहिती विनाशुल्क सोबत जोडून देण्यात येत आहे. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०७.०३.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी अनधिकृत नियमबाह्य बेकायदेशीर बांधकाम नियमित करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेचे परिपत्रक दि. १५.०५.२०२१ रोजीची प्रत मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी असंबंधित माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारित केलेले नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास काही उशिर झाला असल्यामुळे त्यांनी दि. ०१.०१.२०२५ रोजी अपिलार्थींना निशुल्क माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

५. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी एकत्रित सुनावणी घेतात त्यामुळे लक्षात येत नाही की सदर सुनावणी कोणत्या प्रकरणाची आहे.

६. श्री. गोविंद मगर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी यापुढे अपिलार्थींच्या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार विहित मुदतीत सुनावणी घेऊन जर एकापेक्षा जास्त विषयाची माहिती मागितली असेल तर स्वतंत्र आदेश पारित करण्याची दक्षता घ्यावी.

७. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, माहिती अर्जात नमूद केलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिपत्रकाची प्रत त्यांच्या अभिलेखावर उपलब्ध आहे आणि ते अपिलार्थींना उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत.

८. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना त्यांच्या माहिती अर्जात नमूद केलेली बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दि. १५.०५.२०२१ रोजीच्या परिपत्रकाची प्रत आदेशप्राप्तीच्या १० दिवसात नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २७.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**